**MHYA050033002025**

<u>दिवाणी किरकोळ अर्ज क्रं.१०६/२०२५</u>
<u>माया मधुकर जाधव वि.सुशिला मधुकर जाधव</u>
<u>निशाणी क्रं.१ वर आदेश</u>
(<u>दिनांक २१/०४/२०२६</u>)

---

प्रस्तुतचा अर्ज अर्जदार माया मधुकर जाधव व गैरअर्जदार सुशिला मधुकर जाधव, बाबुलाल मधुकर जााधव व रामलाल मधुकर जाधव यांनी त्यांच्या नावे मयत मधुकर मोतीराम जाधव (**यानंतर 'मयत मधुकर' असा उल्लेख**) यांचे वारस म्हणून प्रमाणपत्र निर्गमीत करण्यासाठी दाखल केला आहे.

२. अर्जदाराचे व गैरअर्जदारांचे असे कथन आहे की, मयत मधुकर हे अर्जदार क्रं.१ चे वडिल, गैरअर्जदार क्रं.१ चे पती व २ ते ३ यांचे वडिल होते. मयत मधुकर मोतीराम जाधव हे दिनांक ०६/०३/२००८ रोजी मयत झाले. अर्जदार व गैरअर्जदार क्रं.१ ते ३ हेच मयत मधुकर यांचे कायदेशीर वारस आहेत. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार क्रं.१ ते ३ यांना शासकीय व निमशासकीय कामासाठी मयताचा वारस असल्याबाबत वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे.

३. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे मयत मधुकरचा मृत्यु दिनांक ०६/०३/२००८ रोजी मौजे जमनी धुंदी ता.पुसद, जि.यवतमाळ येथे झाला आहे. अर्जदारांच्या कथनाप्रमाणे मयत मधुकरने मृत्युपुर्वी कोणतेही मृत्यू प्रमाणपत्र अथवा व्यवस्था अधिकारपत्र करुन ठेवले नाही. अर्जदाराशिवाय व गैरअर्जदार क्रं.१ ते ३ शिवाय मयताचे इतर कोणीही वारस नाहीत. येणे प्रमाणे महत्वाच्या कारणावरुन अर्ज मंजूर करण्याची त्यांनी विनंती केली.

४. अर्जदाराव्यतिरिक्त व गैरअर्जदारांव्यतिरिक्त मयत मधुकरचे दुसरे कोणी वारसदार आहेत किंवा नाही हे जाणून घेण्यासाठी या प्रकरणात अर्जदारांच्या वतीने दिनांक १५/०८/२०२५ रोजी "दैनिक सायरन" या वृत्तपत्रात जाहिरनामा प्रकाशित करण्यात आला. सदर वृत्तपत्रातील जाहीरनाम्याची प्रत पटलावर (**<u>नि.क्रं.२८</u>**) अन्वये दाखल केली आहे. तसेच, सदरील जाहीरनाम्याची एक प्रत बेलीफचा अहवाल (**<u>नि.क्रं.७ व ८</u>**) प्रमाणे ग्राम पंचायत कार्यालय, मोप, तहसील कार्यालय, पुसद यांच्या नोटीस बोर्डवर तसेच मा.दिवाणी न्यायालय व.स्तर, पुसद यांच्या कार्यालयाच्या नोटीस बोर्डावर लावून जाहीरनामा जाहीर केल्याचे दिसून येते. आजपर्यंत अर्जदाराव्यतिरिक्त व गैरअर्जदार क्रं.१ ते ३ व्यतिरिक्त मयत मधुकर यांचे इतर कोणी वारस असल्याबाबत या न्यायालयाला आक्षेप प्राप्त झाला नाही.

५. अर्जदार यांनी आपल्या कथनाचे पुष्ठर्थ अर्जदार क्रं.१ माया मधुकर जाधव हिने आपले स्वतःचे पुराव्याचे शपथपत्र (**<u>नि.क्रं.२५</u>**) पटलावर दाखल केले. त्यामध्ये तिने अर्जामधील कथनांची पुनरावृत्ती केली आहे. तर आपल्या तोंडी पुराव्याच्या पुष्ठर्थ पटलावर

कागदोपत्री पुरावा म्हणुन ग्रामपंचायत कार्यालय ज्योतीनगर, पुसद यांनी दिलेले मयत अर्जदार मधुकर मोतीराम जाधव यांचे मृत्यु प्रमाणपत्राची मुळ प्रत (**नि.क्रं.२७**), अर्जदाराच्या आधारकार्डची छायांकित प्रत (**नि.क्रं.२६**), या प्रकरणातील वृत्तपत्रातील जाहिरनाम्याची मुळ प्रत (**नि.क्रं.२८**) व रजिस्टर पोस्टाच्या पोहोच पावतीची प्रत (**नि.क्रं.२१**) पटलावर दाखल केलेल्या आहेत. या कागदपत्रांचे बारकाईने अवलोकन केले असता असे दिसून येते की, मयत मधुकर यांचा मृत्यु दिनांक ०६/०३/२००८ रोजी झाला. पटलावरील पुराव्यावरुन व अर्ज (नि.क्रं.१) मधील कथनांवरुन असे लक्षात येते की, अर्जामध्ये नमूद केलेली व्यक्ती मयत मधुकर मोतीराम जाधव हा पुरुष मयत मधुकर नसल्याबद्दल पटलावर कोणताही आक्षेप कोणाकडूनही आला नाही. म्हणुन अर्जदार व गैरअर्जदार क्रं.१ ते ३ हे मयत मधुकर यांचे वारस आहेत, हे स्पष्ट होते. त्यामुळे अर्जदार व गैरअर्जदार क्रं.१ ते ३ हे वारस आहेत हे गृहित धरुन हा अर्ज मंजुर करता येईल.

६. अशाप्रकारे अर्जदाराव्यतिरिक्त व गैरअर्जदारांव्यतिरिक्त मयत मधुकर यांना इतर कोणीही वारसदार नाहीत, असे गृहीत धरुन मुंबई रेग्युलेशन अधिनियमाचे कलम २ अन्वये अर्जदार व गैरअर्जदार क्रं.१ ते ३ यांच्या नावाने वारस प्रमाणपत्र निर्गमित करण्याबाबत आदेश पारित करणे आवश्यक आहे. या न्यायालयामध्ये आजतागायत मयत मधुकर यास अर्जदार व गैरअर्जदार क्रं.१ ते ३ यांच्या व्यतिरिक्त कोणीही वारसदार असल्याबद्दल आक्षेप प्राप्त झाला नाही. करिता, मी येणेप्रमाणे आदेश पारित करित आहे :–

| –: **आ दे श** :– | |
|---|---|
| १) | मयत मधुकर मोतीराम जाधव हा अर्जदार माया मधुकर जाधव हिचे वडिल, गैरअर्जदार सुशिला मधुकर जाधव हिचा पती, बाबुलाल मधुकर जाधव व रामलाल मधुकर जाधव यांचे वडील आहे, असे कायदेशीर वारस असल्याबद्दल मुंबई रेग्युलेशन,१८२७ चे कलम २ अन्वये परिशिष्ट (ब) मधील नमुन्यात मयताचे वारसांना प्रमाणपत्र निर्गमीत करण्यात यावे व त्याखाली नियमाप्रमाणे नोंद करावी किंवा नोट टाकावी. |
| २) | योग्य ती न्यायालयीन शुल्क भरल्यानंतर वारस प्रमाणपत्र निर्गमित करावे. |
| | **(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर करण्यात आला).** |

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by ABHIJIT ATRE
Date: 2026.04.21 17:00:50 +0530

दिनांक : २१/०४/२०२६
ठिकाण : पुसद

**(ए. एस. अत्रे)**
दिवाणी न्यायाधीश व.स्तर,
पुसद, जि.यवतमाळ.